# मेट्रो ३ चे काम प्रगतिपथावर

■ **मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेचे काम अत्यंत वेगाने सुरू असून, कारशेडमध्ये दाखल झालेल्या ट्रेनच्या माध्यमातून चाचण्याही नियोजनात्मक पद्धतीने सुरू आहेत. येत्या काही महिन्यात मेट्रोच्या पहिल्या टप्प्याच्या लोकार्पणासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने तयारी सुरू केली आहे. एमएमआरसीएच्या माध्यमातून दरदिवशी मेट्रो ३ च्या कामाचा प्रगती अहवाल समाजमाध्यमांवर जाहीर करण्यात येत असून, विविध स्थानकांचे काम व कारशेडचे काम, भुयारी मार्गातील चाचण्याच्या कामाचा आढावा घेण्यात येत आहे.

## पहिल्या टप्प्याचे काम पूर्णत्वाच्या दिशेने




मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या माध्यमातून आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण डिसेंबर २०२३ पूर्वी करण्याचे उद्दिष्ट्य समोर ठेवण्यात आले आहे. सध्या २ मेट्रोचे डबे आरे कारशेडमध्ये दाखल झाले आहेत, येत्या काही दिवसांत ५ मेट्रोचे डबे दाखल होणार आहेत. तर टप्पा १ साठी आणखी चार असे एकूण ९ मेट्रो डबे दाखल होणार आहेत. मेट्रो ३ च्या पहिल्या टप्प्याच्या चाचण्यांची प्रक्रिया सध्या सुरू असून, रेल्वे सुरक्षा प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच लोकार्पण करण्यात येणार आहे.

तर दोन दिवसांपूर्वीच विद्यानगरी मेट्रो स्थानकाचे सिव्हिल वर्क ९२.८ टक्के आणि सिस्टीम कार्यप्रणालीचे ६६.८ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती एमएमआरसीएलने दिली आहे. दोन दिवसांपूर्वी मेट्रो ३ च्या पहिल्या टप्प्यातील बीकेसी स्थानकाचे सिव्हिल वर्क ९२.३ आणि सिस्टिम कार्यप्रणालीचे काम ६१ टक्के पूर्ण झाले आहे. एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे आणि प्रकल्प संचालक सुबोध गुप्ता यांनी बीकेसी स्थानकाला भेट दिली होती.